## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/१०/२०१६

**१) महीलेचा विनयभंग करुन मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी १९.१५ वा. दर. यातील आरोपी हा वाईट उद्येशाने अचानक फिर्यादीच्या घरात जावुन फिर्यादी ही पलंगावर बसली असता आरोपीने फिर्यादी सोबत अश्लिल कृत्य केला व मारीन अशी धमकी देवुन हातांना पकडुन ओढतांन केली असता हातातील बांगडया फुटुन दोन्ही हाताला खरोच आली व फिर्यादीचे दोन्ही गालावर थापडा मारुन फिर्यादीचे पती आडवे झाले असता पतीला मारण्याची धमकी देवुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५२,३५४,३२३,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगी घरी मिळुन न आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/१०/२०१६ रोजी २२.०० वा. दर. यातील फिर्यादीची गुम अल्पवयीन मुलगी हीने चार्जीग लाईट फिर्यादीचे दुकानात आणुन घराकडे जातो म्हणुन निघुन गेली फिर्यादी हा घरी गेला असता ती घरी दिसुन न आल्याने तिचा गावात रिस्तेदारीत शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादी शैलेन्द्र भास्कर घोडीचोर वय ४७ वर्ष, रा. पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून व शासनाचे परीपत्रका अन्वये पोस्टे. पवनी येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) दारुच्या कारणावरुन भांडण करुन फावडयाने मारुन गंभिर दुखापत केली . :–**

दिंनाक. ११/१०/२०१६ रोजी २२.१५ वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस दारुचे दुकान बंद असतांना जबरदस्तीने दारुची मागणी केली असता फिर्यादीने दारु देण्यास नकार दिल्याचे कारणा वरुन आरोपीतांनी भांडण करुन फिर्यादीचे डोक्यावर आरोपी क्र. १ ने फावडयाने मारुन गंभिर दुखापत केल्याने फिर्यादी सुरज पाडुरंग मेलफलवार वय २९ वर्ष, रा. इंदीरा नगर तुमसर यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पो.स्टे तुमसर येथे कलम ३२६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १२/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९४ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ८४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता